विश्वास नगर, लेबर कॉलनी, औरंगाबाद येथे जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीचे बांधकाम करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- बीएलडी २०२२/प्र.क्र. १७०/ ई-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०२ मार्च, २०२३.

**संदर्भ:-** १) जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०२२/सा.प्र/प्रशासन/जि.अ.का./इमारत/त.म.का. अंदाजपत्र/कावि-३६४,दि. ०९/१२/२०२२.
२) पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क्र.,१, दि. १०/१/२०१४.

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भाधिन क्र. १ येथील पत्रान्वये विश्वास नगर, लेबर कॉलनी, औरंगाबाद येथे जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीचे बांधकाम करण्याबाबत रु. २४८७४.५८ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केले होते.

२. सदर अंदाजपत्रक उप विभागीय अभियंता, सा.बां. (उत्तर)उपविभाग,औरंगाबाद यांनी तयार केले असून कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग , औरंगाबाद यांनी तपासले आहे. तसेच अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद व मुख्य अभियंता,सा.बा.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी स्वाक्षांकित केले आहे.

३. सदर अंदाजपत्रकातील बाबी सन २०२२-२३ च्या दरसूचीवर आधारीत आहे.

**शासन निर्णय :-**

विश्वास नगर, लेबर कॉलनी, औरंगाबाद येथे जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीचे बांधकाम करण्याबाबत सादर केलेल्या अंदाजपत्रकांची सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांनी तपासणी केल्यानंतर तपासणी अंती सोबतच्या सहपत्र 'अ' अनुसार रु. **रु. १४७८०.२० लक्ष इतक्या** रकमेस खालील अटीच्या अधीन राहून तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

सदर प्रस्तावाची किंमत रू.१५ कोटी पेक्षा जास्त असल्याने प्रस्ताव दि.२४/०२/२०२३ रोजी झालेल्या उच्चस्तरीय समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. **सदर बैठकीमध्ये नविन जिल्हाधिकारी इमारत बांधल्यानंतर, अस्तित्वातील जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीच्या वापराबाबत महसूल विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी एकत्रितपणे विचार करावा, या अटींच्या अधिन उच्चस्तरीय समितीने अंदाजित रू.१४७.८० कोटी इतक्या रकमेस सहमती दर्शविली आहे.**

त्यास अनुसरुन  विश्वास नगर, लेबर कॉलनी, औरंगाबाद येथे जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीचे बांधकाम करण्याबाबत **रु. १४७८०.२० लक्ष** (रुपये एकशे सत्तेचाळीस कोटी ऐंशी लाख वीस हजार फक्त)  इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून शासन प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

**अटी व शर्ती** -

१) सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची खातरजमा करण्यात यावी.

२) प्रस्तुत काम पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत येत असल्यास संबंधित विभागाची तसेच महानगरपालिका व तत्सम प्राधिकरणे यांची पूर्व परवानगी घ्यावी.

३) तांत्रिक मंजूरी देतांना राज्य दरसूचीबाह्य बाबींच्या दराकरीता शासन परिपत्रक क्रमांक २०१७/ प्र.क्र.११/ नियोजन-३, दि. ११/०४/२०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) प्रस्तावातील खरेदीशी संबंधीत बाबींकरिता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि. २४/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.

५) प्रत्यक्ष काम  करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क., दि. १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६) स्थापत्य कामाच्या कालावधीतच विद्युतीकरणाबाबत तसेच इतर अनुषंगीक कामांचे योग्य नियोजन करुन सदर कामे पूर्ण करावीत.

७) इमारतीमध्ये दिव्यांगाकरीता उपलब्ध करुन द्यावयाच्या विविध सोयींबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

८) विषयांकीत कामांकरीता सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही, यादृष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.

सदर इमारत बांधकामासाठी येणारा खर्च लेखाशिर्ष “मागणी क्रमांक एच-८ ४०५९ -सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१, बांधकाम (०७) जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत) ५३, मोठी बांधकामे (०७)(०१) मोठी बांधकामे (४०५९ ०७९९) (०७)(०२) आस्थापना खर्च

(४०५९ ०८०५) (०७)(०३) हत्यारे व संयंत्र यांचा खर्च (४०५९ ०८१४)" या उद्दिष्टाखाली उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानामधून भागविण्यात यावा.

**३.** सदर कामाची सुरुवात सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून सुरु होत आहे.

**४.** सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-विअप्र-२०१३/प्र.क्र.-३०/ १३/विनियम, भाग-२, दिनांक १७/०४/२०१५ मधील भाग- पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ नियम क्र. १३४ अन्वये प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार आणि दि.२४/०२/२०२३ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये मान्यता दिल्यानुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५/इमा-३, दि.१२/०१/२०२३ च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२३०५१२१५१४२३६८१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

ATUL ASHOK KODE

Digitally signed by ATUL ASHOK KODE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F0D5EE4C99CC9CBFA8761B3DDC7BD6650BAD33302F33A35400AD5AAD2291371A, cn=ATUL ASHOK KODE
Date: 2023.05.12 15:17:20 +05'30'

**(अतुल कोदे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
२. जिल्हाधिकारी, औरंगाबाद
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१/२, महाराष्ट्र, .
५. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा-औरंगाबाद.
७. सह सचिव/ उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३), मंत्रालय, मुंबई-३२.
८. सह सचिव/ उप सचिव, नियोजन विभाग, कार्यासन-१४७५, मंत्रालय, मुंबई-३२.
९. सह सचिव/ उप सचिव, वित्त विभाग, (व्यय-९), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. निवड नस्ती, (कार्यासन ई-८), महसूल व वन विभाग, मुंबई-३२.

Name of the Department : Revenue and Forest Department

Name of Work : Construction of New Collector office Building at Vishwas nagar (Labour Colony) Aurangabad

RECAPITULATION SHEET

| Sr. No. | Particulars of Scope | Unit Rate Norms Rs/(Sqmt./M) / LS | | Cost Rs. | |
|---|---|---|---|---|---|
| | | Units | Rate | Component Wise | Total |
| (A) | ESSENTIAL ITEMS (Components) | | | | |
| 1 | (a) Building proper (Built Up Area - Sq.m) | | | | |
| | Basement Floor | 743.00 | 18,000 | 1,33,74,000 | |
| | Ground Floor | 4,103.66 | 28,000 | 11,49,02,480 | |
| | 1st Floor | 6,586.63 | 28,000 | 18,44,25,640 | |
| | 2nd Floor | 5,393.28 | 28,000 | 15,10,11,840 | |
| | 3rd Floor | 6,131.77 | 28,000 | 17,16,89,560 | |
| | Sub Total (a) | 22,958.34 | | | 63,54,03,520 |
| | (b) Parking Building proper (Built Up Area - Sq.m) | | | | |
| | Basement Floor | 3,600.00 | 18,000 | 6,48,00,000 | |
| | Ground Floor | 3,600.00 | 18,000 | 6,48,00,000 | |
| | 1st Floor | 3,600.00 | 18,000 | 6,48,00,000 | |
| | 2nd Floor | 3,600.00 | 18,000 | 6,48,00,000 | |
| | Sub Total (b) | 14,400.00 | | | 25,92,00,000 |
| | Total | 37,358.34 | | | |
| | Rain/ Roof Water Harvesting | | L.S. | 20,00,000 | |
| | Furniture | 15,550.74 | 5,000 | 7,77,53,700 | |
| | | | | Sub Total (1) | 97,43,57,220 |
| 2 | Water Supply & Sanitary Works | 5% of (a) | | Sub Total (2) | 3,17,70,176 |
| 3 | Electrification Internal | | 5% of (a) | 3,17,70,176 | |
| | External | | 6% of (a) | 3,81,24,211 | |
| | Fire Fighting Arrangements etc. | | L.S. | 1,50,00,000 | |
| | | | | Sub Total (3) | 8,48,94,387 |
| | | | Sub Total (A) | | 1,09,10,21,783 |
| (B) | MISCELLANEOUS ITEMS | | | | |
| | Compound Wall & Gate (Rmt) | 1,272 | 8,000 | 1,01,76,000 | |
| | Internal Roads (Rmt) | | L.S. | 50,00,000 | |
| | Approach Road (500 mts.) | | L.S. | 25,00,000 | |
| | Development of Ground | | L.S. | 20,00,000 | |
| | Land Scaping | | L.S. | 25,00,000 | |
| | Soil Investigations & Detail Land Survey | | L.S. | 5,00,000 | |
| | CC Drains and C/D Works | | L.S. | 1,00,00,000 | |
| | | | | Sub Total (B) | 3,26,76,000 |
| | | | Sub Total | (A+B) | 1,12,36,97,783 |
| (C) | OPTIONAL ITEMS | | | | |
| | Undergound Water Tank for R/W Harvesting | | L.S. | 50,00,000 | |
| | Water Main Storage, and pump house, bore well | | L.S. | 20,00,000 | |
| | Air Conditioning | | L.S. | 1,00,00,000 | |
| | Lifts (15 Nos.) | | L.S. | 1,50,00,000 | |
| | AB Room, Area Lighting, Pump, Generator | | L.S. | 25,00,000 | |
| | External Toilets | | L.S. | 10,00,000 | |
| | Flag Post | | L.S. | 5,00,000 | |
| | Watchmen Cabin (5 Nos.) | | L.S. | 20,00,000 | |
| | MSEDCL Connection Charges | | L.S. | 25,00,000 | |
| | Accoustic and Dolby System | | L.S. | 50,00,000 | |
| | Play Ground, Volleyball etc. | | L.S. | 20,00,000 | |
| | Electrical Seperate DP & Pole | | L.S. | 50,00,000 | |
| | | | | Sub Total (C) | 5,25,00,000 |
| | | | Project Cost (P)= | (A) + (B) + (C) | 1,17,61,97,783 |
| (D) | PROVISIONS | | | | |
| | (i) Contingencies | | 4% on (a) | 2,54,16,141 | |
| | (ii) Labour Insurance | | 0.5% on (P) | 58,80,989 | |
| | (iii) GST | | 18% on (P) | 21,17,15,601 | |
| | (v) Price escalation | | 5% on (P) | 5,88,09,889 | |
| | | | Sub Total (D) | | 30,18,22,620 |
| | TOTAL COST OF PROJECT (TPC) | | | (A+B+C+D) | 1,47,80,20,403 |
| | | | Say Rs. Lakhs | 14780.20 | |

PLINTH AREA RATES FOR

| | | | |
|---|---|---|---|
| (i) Bldg Proper Cost | `= | Rs | 27,676.37 /Sqm |
| (ii) Elect. Work | `= | Rs | 3698 /Sqm |
| (iii) Water Supply | `= | Rs | 1,384 /Sqm |
| (iv) For (i) + (ii) + (iii) | `= | Rs | 32758 /Sqm |

(v) Total Project Cost = TPC ÷ Area (as per "a") 64378